मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ठेवीत घट

## दशकभरात जवळपास 2 हजार कोटींची घट; महापालिका 560 कोटींच्या कर्जाखाली

**पिंपरी | प्रतिनीधी**

एके काळी आशिया खंडातील सर्वांत श्रीमंत असा लौकिक असलेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ठेवींमध्ये घट झाली आहे. सन २०१५-१६ मध्ये सहा हजार ८६२ कोटी ८९ लाख रुपयांच्या असलेल्या ठेवी २०२५ मध्ये चार हजार ८९४ कोटी ७८ लाखांवर घसरल्या आहेत. दशकभरात एक हजार ९६८ कोटी ११ लाखांनी ठेवींत घट झाली आहे. महापालिकेवर ५६० कोटी रुपयांचे कर्जही आहे.




पिंपरी-चिंचवड महापालिकेचा अर्थसंकल्प फुगत असताना उत्पन्न घटत आहे. चालू आर्थिक वर्षाचा (२०२५-२६) महापालिकेचा अर्थसंकल्प नऊ हजार ६७५ कोटी २७ लाख रुपयांचा आहे. अर्थसंकल्पाचे आकडे वाढत असताना उत्पन्न मात्र घटत आहे. भोसरीचे भाजप आमदार महेश लांडगे यांनी महापालिकेच्या ठेवींची माहिती मागविली होती. लेखा विभागाने लांडगे यांना लेखी माहिती दिली आहे. तत्कालीन एकत्रित राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असताना सन २०१५-१६ मध्ये महापालिकेकडे सर्वसाधारण आणि इतर निधी मिळून सहा हजार ८६२ कोटी ८९ लाख रुपयांच्या ठेवी होत्या. त्यानंतर काही वर्षांत ठेवींत मोठी घट झाली. सन २०१८-१९ मध्ये या ठेवी चार हजार १९४ कोटींवर, तर २०२२-२३ मध्ये तीन हजार ४७३ कोटी रुपयांवर आल्या. त्यानंतर २०२३-२४ मध्ये ठेवी वाढून पाच हजार ६३३ कोटींवर पोहोचल्या. मात्र, पुन्हा २०२४-२५ मध्ये चार हजार ८९४ कोटी ७८ लाखांवर आल्या.

### महापालिकेवर 560 कोटींचे कर्ज

» महापालिकेने कासारवाडीतील नाशिक फाटा येथील दुमजली उड्डाणपूल बांधण्यासाठी १५९ कोटी ९१ लाख रुपयांचे कर्ज घेतले. ते कर्ज ३० वर्षांसाठी आहे. मुळा नदी सुधार प्रकल्पासाठी चार वर्षे कालावधीसाठी २०० कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे. हरित सेतू आणि टेल्को रस्त्यावर अर्बन स्ट्रीट डिझाइनद्वारे सुशोभीकरण करण्यासाठी हरित कर्जरोख्यांद्वारे २०० कोटी रुपयांचे कर्ज काढण्यात आले आहे. त्याचा कालावधी पाच वर्षे आहे. महापालिकेने आतापर्यंत ५५९ कोटी ९१ लाख रुपयांचे कर्ज घेतले आहे. त्यापैकी ३६४ कोटी ५१ लाख रुपयांचे कर्ज फेडणे बाकी आहे.

“ चालू आर्थिक वर्षातील ऑक्टोबर २०२५ पर्यंत महापालिकेकडे सुमारे ₹4,894 कोटींच्या मुदतठेवी आहेत. विविध विकासकामांसाठी महापालिकेने कर्जरोखे काढले आहेत. त्यासाठी राज्य आणि केंद्र शासनाकडून ₹46 कोटींचे अनुदान मिळणार असून, त्यापैकी ₹26 कोटी प्राप्त झाले आहेत आणि ₹20 कोटी प्रलंबित आहेत.

**- प्रवीण जैन, मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी, महापालिका.**

# पिंपळे गुरव येथील राजमाता जिजाऊ उद्यान समस्यांच्या विळख्यात


## नादुरुस्त ओपन जिमचे साहित्य, भटक्या कुत्र्यांचा वावर आणि अस्वच्छतेचे साम्राज्य

**पिंपरी | प्रतिनीधी**

नादुरुस्त ओपन जिमचे साहित्य, भटक्या कुत्र्यांचा वावर, आणि अस्वच्छतेचे साम्राज्य अशा विविध समस्यांच्या विळख्यात पिंपळे गुरव येथील राजमाता जिजाऊ उद्यान अडकले असल्याची माहिती मानवी हक्क संरक्षण जागृतीचे शहराध्यक्ष अण्णा जोगदंड यांनी दिली आहे.







अण्णा जोगदंड यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, पिंपळे गुरव येथील राजमाता जिजाऊ उद्यानच्या पार्किंग मध्ये कचऱ्याचे साम्राज्य झाले आहे, या ठिकाणी ठराविक ठिकाणचाच कचरा उचलला जातो, परंतु पार्किंगमधील झाडाच्या मधला व अडगळीतला कचरा उचलला जात नाही. झाडांच्या बुंध्याजवळ मोकळ्या तसेच कोपऱ्यात चहाचे कप, प्लास्टिक पिशव्या खूप इतरत्र पसरलेल्या दिसतात. मी स्वतः दररोज पहाटे उद्यानात जात असतो. येथे उद्यान विभागाच्या कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. उद्यान विभागाचे कर्मचारी अजय जाधव यांना फोनवरून विचारणा केली असता ते उडवाउडवीची व खोटी माहिती देतात. पार्किंगची स्वच्छता आरोग्य विभागाकडे आहे असे सांगितले जाते.

या उद्यानात दररोज अनेक नागरिक मॉर्निंग वॉक तसेच फेरफटका मारायला येत असतात. या ठिकाणी अनेक भटक्या कुत्र्यांचा वावर वाढला असून लहान मुले तथा ज्येष्ठ नागरिकांवर या कुत्र्यांचा हल्ला होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या उद्यानात ओपन जीमचे साहित्य गेल्या अनेक महिन्यांपासून नादुरुस्त झालेले आहे. अनेक वेळा नागरिकांनी याबाबत तक्रारी केल्या आहेत. मात्र उद्यान विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. तरी तातडीने या उद्यानाकडे प्रशासनाने लक्ष देऊन समस्यांच्या विळख्यातून बाहेर काढावे अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहे.

# पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलात 322 जागांची भरती

## 30 नोव्हेंबरपर्यंत ऑनलाइन माध्यमातून भरतीसाठी अर्ज स्वीकारले जाणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलात शिपाई पदाच्या ३२२ जागांची भरती केली जाणार आहे. त्यासाठी ऑनलाइन माध्यमातून अर्ज स्वीकारण्यास सुरुवात झाली आहे. ३० नोव्हेंबरपर्यंत भरतीसाठीचे अर्ज स्वीकारले जाणार आहेत.



पिंपरी-चिंचवड शहर पोलीस भरतीमध्ये सर्वसाधारण उमेदवारांसाठी ९७ पदे, महिला ९७ पदे, खेळाडू १६ पदे, प्रकल्पग्रस्त १६ पदे, भूकंपग्रस्त सहा पदे, माजी सैनिक ४८ पदे, अंशकालीन पदवीधर १६ पदे, पोलीस पाल्य १० पदे, गृहरक्षक दल १६ पदे भरली जाणार आहेत. उमेदवारांना अर्ज करण्यासाठी महाराष्ट्र पोलिसांच्या POLICERECRUITMENT2025. MAHAIT.ORG या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजित केली जाणार असल्याने उमेदवार संपूर्ण महाराष्ट्रात फक्त एका घटकातच अर्ज करू शकतो. उमेदवाराने चुकीची माहिती दिल्यास उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.

भरती प्रक्रियेत प्रथम शारीरिक चाचणी घेण्यात येईल. त्यामध्ये किमान ५० टक्के गुण मिळवणाऱ्या उमेदवारांमधून १:१० प्रमाणात उमेदवारांची शंभर गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांनी लेखी परीक्षेत किमान ४० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे. ४० टक्क्यांहून कमी गुण मिळवणारे उमेदवार अपात्र समजले जातील. शारीरिक आणि लेखी चाचणी मधील गुणांच्या आधारे उमेदवारांची एक गुणवत्ता यादी तयार केली जाईल. त्या उमेदवारांची मूळ कागदपत्रे पडताळणी केली जाईल. कागदपत्र पडताळणी मध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी तयार केली जाईल. त्यानंतर अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल. पोलीस भरतीच्या अर्जासाठी उमेदवार दहावी किंवा बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. १८ ते २८ वर्ष वयोगटातील उमेदवारांना अर्ज करता येईल.

### प्रवर्गनिहाय भरल्या जाणाऱ्या जागा

- ईडब्ल्यूएस ४६
- एसईबीसी ३४
- इमाव ८०
- विमाप्र ८
- भ.ज.-ड ७
- भ.ज.-क १९
- भ.ज.-ब १७
- वि.ज.-अ १२
- अ.ज. २२
- अ. जा. ४२
- अराखीव ३५

> पोलीस भरती करण्याबाबत कोणीही पैशांची अथवा इतर कोणत्याही स्वरूपाची मागणी केल्यास संबंधित उमेदवारांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करावी. इतर अडचण असल्यास पोलीस भरती समितीचे अध्यक्ष तथा पोलीस आयुक्त यांच्याकडे तक्रार करावी.
>
> **- श्वेता खेडकर, उपायुक्त तथा अध्यक्ष, पोलीस भरती समिती, पिंपरी-चिंचवड.**

# आयएफएससी आशियाई स्पर्धेमुळे खेळाडूंना उपलब्ध झाले आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यासपीठ

## आमदार शंकर जगताप; पिंपरी चिंचवड मध्ये 4 नोव्हेंबर पर्यंत स्पर्धा रंगणार, 200 परदेशी खेळाडूंचा सहभाग

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेने आयोजित केलेल्या आयएफएससी आशियाई स्पर्धेमुळे स्थानिक खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यासपीठ मिळत आहे. शहरातील क्रीडा क्षेत्रासाठी आणि राज्यासाठी ही खूप महत्त्वाची बाब आहे,' असे प्रतिपादन आमदार शंकर जगताप यांनी केले.




पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे सह आयोजकत्वाने आय.एफ. एस.सी. एशिया यांच्या मान्यतेने तसेच भारतीय पर्वतारोहण संस्थान आणि महाराष्ट्र स्पोर्ट क्लाइंबिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपळे सौदागर येथील महानगरपालिकेच्या योगा उद्यानातील पी.सी.एम.सी. क्लायबिंग वॉल येथे दि. १ ते ४ नोव्हेंबर या काळात येथील आय.एफ.एस.सी. एशिया किडस् अजिंक्यपद स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आलेले होते,या स्पर्धेचे उद्घाटन आमदार शंकर जगताप यांचे हस्ते काल संध्याकाळी संपन्न झाले त्यावेळी ते बोलत होते.

महापालिका अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त पंकज पाटील यांच्या अधिपत्याखाली आयोजित या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यास माजी नगरसदस्य शत्रुघ्न उर्फ बापू काटे, विठ्ठल उर्फ नाना काटे, निर्मला कुटे,भारतीय पर्वतारोहण संस्थेचे अध्यक्ष निवृत्त कर्नल विजय सिंग, आय एफ एस सी एशियाचे सेक्रेटरी जनरल रासिप इसनीन, व्हाईस प्रेसिडेंट किर्ती पायस, भारतीय पर्वतारोहण संस्थान पश्चिम विभागाचे चेअरमन के. सरस्वती, सचिव श्रीकृष्ण कडूसकर, महाराष्ट्र स्पोर्ट क्लाइंबिंग असोसिएशनचे अध्यक्ष सुरेंद्र शेळके, कर्नल देवांग नायक,सागर पालकर, नम्रता निकम,अकबल अमीन,डॉ. राधिका पाटील, किर्ती शेट्टी महापालिकेचे सह शहर अभियंता बापू गायकवाड, कार्यकारी अभियंता सुनील पवार, माजी अतिरिक्त आयुक्त रोहिदास कोंडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते कुंदाताई भिसे,संदीप काटे,पोपटराव काटे, विलास पाडळे,राकेश इसिन यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार शंकर जगताप म्हणाले, 'महाराष्ट्रात प्रथमच पिंपरी-चिंचवड शहरात आयएफएससी आशियाई क्लाइंबिंग चॅम्पियनशिप स्पर्धा होत आहेत आणि पिंपरी चिंचवड महापालिका या ऐतिहासिक उपक्रमाचा भाग असल्याचा आम्हाला अभिमान आहे,असे सांगून त्यांनी भविष्यातही महापालिका अशा स्पर्धांना संपूर्ण पाठबळ देईल, असा विश्वास व्यक्त केला.

पिंपरी चिंचवडमधील सर्व नागरिकांना या सुविधेचा लाभ मिळणार आहे. विशेषत्वाने या भागात असलेल्या शालेय मुलांना याचा विशेष फायदा होईल. कारण हा खेळ ऑलिंपिक खेळ आहे, आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील दर्जेदार सुविधा मिळाल्यास त्यांना या खेळात चांगली कामगिरी करणे शक्य होईल. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शालेय मुलांना देखील याचा लाभ होईल. ज्यामुळे समाजातील तळागाळातील अगदी शेवटच्या नागरिकांपर्यंत याचा लाभ मिळेल. पिंपळे सौदागर, वाकड, पिंपळे निलख या पिंपरी चिंचवडमधील अतिशय वेगाने वाढणाऱ्या भागात या प्रकल्पाचे काम झाल्यामुळे आणि या भागात दळणवळणासाठी अतिशय उत्तम सुविधा असल्याने या भागातील आणि संपूर्ण शहरातील खेळाडूंना व नागरिकांना याचा लाभ होईल, अशी माहिती यावेळी माजी नगरसदस्य शत्रुघ्न उर्फ बापू काटे,विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी दिली.

दरम्यान, देश-विदेशातील खेळाडू, मान्यवर आणि नागरिकांच्या उपस्थितीत झालेल्या या उदघाटन सोहळ्यात वातावरण उत्साहाने भारावून गेले. मान्यवरांच्या हस्ते बलून आकाशात सोडण्यात आले आणि त्या क्षणी संपूर्ण परिसरात जल्लोष पसरला.

# पुण्यातील बेकरी व्यावसायिकांवर होणार कारवाई ?

## बेकरी व्यावसायिकांनी लाकूड, कोळशाऐवजी हरित इंधनाचा वापर सुरु न केल्यास कारवाई केली जाईल, असा इशारा महापालिकाने दिला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात वायू प्रदूषण वाढत असताना शहरातील अनेक बेकरी व्यावसायिक लाकूड, कोळशाचा वापर करत असल्याचे उघडकीस आले आहे. संबंधित बेकरी व्यावसायिकांनी लाकूड, कोळशाऐवजी पुढील दहा दिवसांत हरित इंधनाचा वापर सुरू न केल्यास कारवाई केली जाईल, असा इशारा महापालिका प्रशासनाने बेकरी व्यावसायिकांना दिला आहे.

शहरामध्ये हवेतील प्रदूषणामध्ये वेगवेगळ्या कारणांनी सतत वाढ होत आहे. वाढत असलेल्या प्रदूषणाचा गंभीर परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाने (एमपीसीबी) हवेतील प्रदूषण कमी करण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध केली आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या हद्दीतील बेकऱ्या, रेस्टॉरंट्स, ढाबा या ठिकाणी हरित इंधनाचा वापर सुरू करावा, असे आदेश महामंडळाने दिले आहेत. यानुसार महापालिकेच्या पर्यावरण विभागाचे उपायुक्त रवी पवार यांनी शहरातील बेकरी व्यावसायिकांची बैठक घेतली. यामध्ये हरित इंधनाचा वापर करण्याचे आदेश देण्यात आले.शहर आणि उपनगरांमध्ये बेकऱ्यांची संख्या एक हजारापेक्षा अधिक आहे. बेकरी व्यवसायासाठी आजही मोठ्या प्रमाणावर लाकूड, कोळसा यांचा वापर केला जातो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात धूर निर्माण होऊन हवेच्या प्रदूषणात वाढ होत असल्याचे उपायुक्त पवार यांनी बेकरी व्यावसायिकांच्या लक्षात आणून दिले.

काही बेकरी व्यावसायिकांनी हरित इंधनाचा वापर सुरू केला असून, काही जण एलपीजी, पीएनजी, वीज या हरित इंधनाचा वापर करण्याच्या प्रक्रियेत आहेत. मात्र, काही व्यावसायिक याकडे दुर्लक्ष करत आहेत. बेकरीचा व्यवसाय करताना व्यावसायिकांनी हरित इंधनाचा वापर करून हवेतील प्रदूषण कमी करण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले.यावेळी बेकरी व्यावसायिकांनी हरित इंधन वापर करण्यासाठी येणाऱ्या अडचणी पवार यांच्यासमोर मांडल्या. जे व्यावसायिक दहा दिवसांत हरित इंधनाचा वापर करणार नाहीत, त्यांच्यावर महापालिकेच्या वतीने कडक कारवाई केली जाईल, असा इशारा या बैठकीत देण्यात आला.

बेकरी असोसिएशनने स्वच्छ इंधनाकडे वळताना येणाऱ्या तांत्रिक आणि आर्थिक अडचणींचा उल्लेख करत, महापालिकेकडून आर्थिक सहाय्य मिळावे अशी मागणी केली. हवा (प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम १९८१ च्या कलम ३१ (अ) नुसार, एमपीसीबीने बेकरी, हॉटेल, रेस्टॉरंट, खाद्यपदार्थ स्टॉल आणि ढाब्यांमध्ये लाकूड, कोळसा आणि तंदूरचा वापर टाळून एलपीजी, पीएनजी, वीज किंवा हरित ऊर्जा वापरण्याचे मार्गदर्शक तत्त्व जारी केले आहे. वाढत असलेल्या प्रदूषणाचा गंभीर परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाने (एमपीसीबी) हवेतील प्रदूषण कमी करण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध केली आहेत.




### वाहनांची वाढणारी संख्या प्रदूषणाचे मुख्य कारण

» पुण्याच्या रस्त्यांवर धावणाऱ्या वाहनांची संख्या वायू प्रदूषणात वाढ होण्याचे एक प्रमुख कारण आहे. जुलै २०२५ पर्यंत पुण्यात एकूण ४१ लाख २५ हजार ९६८ वाहने झाली आहेत. गेल्या वर्षभरात यात सुमारे तीन लाखांची वाढ झाली आहे. २०२३-२४ मध्ये ही संख्या ३८ लाख ६३ हजार ८४९ होती. या वाढत्या संख्येत इलेक्ट्रिक वाहने (३३,३८७), सीएनजी वाहने (४३,५३३) आणि हायब्रीड वाहने (५,७८१) यांचा समावेश आहे. मात्र पेट्रोलवर चालणाऱ्या वाहनांची संख्या अजूनही सर्वाधिक आहे, ज्यामुळे प्रदूषणाची पातळी वाढतच आहे.

### नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर होणार

» बैठकीत महापालिकेच्या पर्यावरण विभागाने स्पष्ट केले की, ज्यांनी अद्याप हरित इंधनाचा वापर सुरू केलेला नाही, त्यांनी तातडीने रुपांतरण करावे. अन्यथा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

# कात्रज-कोंढवा रस्त्याचे काम जूनपर्यंत पूर्ण करणार : आयुक्त नवल किशोर राम यांची ग्वाही

## इस्कॉन मंदिर चौकातील रुंदीकरण कामाच्या पाहणीदरम्यान आयुक्तांचा आदेश; दर्जा आणि गतीवर विशेष भर

**पुणे | प्रतिनिधी**

कात्रज-कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम इस्कॉन मंदिर चौकात वेगाने सुरू आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी शनिवारी या कामाची पाहणी केली. इस्कॉन मंदिर चौकातील काम पुढील महिनाभरात पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या कामानंतर वाहतूक पूर्ववत करून उर्वरित टप्प्यातील कामावर लक्ष केंद्रित करण्यात येणार असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले. तसेच कात्रज-कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम येत्या जून महिन्यापर्यंत पूर्ण करण्याची ग्वाही या वेळी त्यांनी दिली.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी कान्हा हॉटेल चौकातील वाहतूक वळविण्याची अंमलबजावणी, कामाचा दर्जा आणि प्रगतीची सविस्तर माहिती घेतली. या वेळी पथ विभागाचे उपअभियंता धनंजय गायकवाड उपस्थित होते.

नवल किशोर राम म्हणाले, 'इस्कॉन मंदिर चौकातील रस्त्याचे काम आणखी वेगाने पूर्ण होण्यासाठी सर्व विभागांकडून समन्वय साधण्यात येईल. नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने हे काम पूर्ण करण्याला प्राधान्य देण्यात येत आहे. जागामालकांनी प्रशासनाला सहकार्य करावे,' असे आवाहन या वेळी त्यांनी केले. तसेच जागामालकांनी मनात कुठलीही शंका किंवा संकोच ठेवू नये.

आयुक्तांनी शत्रुंजय मंदिर परिसरात सुरू असलेल्या कामांची पाहणी करत पथ विभागातील अभियंते आणि सल्लागारांकडून सविस्तर माहिती घेतली. 'कामाचा दर्जा सर्वोत्तम राखत ते ठरविलेल्या वेळेत पूर्ण व्हावे, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे,' असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. उर्वरित 34 मीटर रुंदीच्या पट्ट्याचे भूसंपादनदेखील लवकरच सुरू होणार असून, नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा ठरणार आहे. जमीन मालकांना योग्य मोबदला देण्यात येईल, असे आश्वासन आयुक्तांनी दिले.



> “ कात्रज-कोंढवा रस्त्याच्या 50 मीटर रुंदीकरणासाठी भूसंपादनाची प्रक्रिया जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सुरू असून, त्यासाठी चारशे कोटी रुपयांचा निधी वर्ग करण्यात आला आहे. पुढील पावसाळ्यापूर्वी म्हणजेच जूनपर्यंत कात्रज-कोंढवा रस्त्याची परिस्थिती पूर्णपणे बदललेली असेल. हे काम माझ्या जबाबदारीतील असून, नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे.
>
> - नवल किशोर राम, आयुक्त, पुणे महापालिका.

# तळेगाव गटात उमेदवारीचा पेच कायम

## शिरूर तालुक्यातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले आणि राजकीय दृष्ट्या प्रभावशाली ठरलेले तळेगाव ढमढेरे गाव पुन्हा एकदा चर्चेत आले

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिरूर तालुक्यातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले आणि राजकीय दृष्ट्या प्रभावशाली ठरलेले तळेगाव ढमढेरे गाव पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. या गावात सर्वच प्रमुख राजकीय पक्षांचे (भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस दोन्ही गट, काँग्रेस, शिवसेना दोन्ही गट, मनसे, आरपीआय, बसप) पदाधिकारी, कार्यकर्ते आणि माजी सदस्य आहेत. तरीदेखील यंदा गावातून एकही उमेदवार जिल्हा परिषद निवडणुकीसाठी पुढे येत नाही, हे अनेकांना आश्चर्यकारक वाटत आहे.

या पार्श्वभूमीवर गावातील मुळोबा मंदिर राजकीय बैठकींचे केंद्रबिंदू बनले आहे. गावातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्रामपंचायत, सोसायटी निवडणुकांच्या अनेक यशस्वी बैठका या मंदिरातून पार पडल्या. त्यामुळे जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज होणारी 'एक गाव एक उमेदवार' बैठक गावाला फलदायी ठरेल, असा आशावाद ग्रामस्थांना आहे. आरक्षण जाहीर झाल्यापासून गावातील कार्यकर्ते, पदाधिकारी आणि ज्येष्ठ ग्रामस्थ येथे चर्चेसाठी एकत्र येऊ लागले आहेत. प्रत्येक पक्ष आपापली रणनीती ठरवत असला तरी गावातील राजकीय संतुलन बिघडू नये म्हणून सर्वजण सावध पवित्रा घेत आहेत.

गावातील काही सामाजिक कार्यकर्त्यांनी व ज्येष्ठांनी 'एक गाव, एक उमेदवार' या भूमिकेवर ठाम राहण्याचे सुचविले आहे, जेणेकरून तळेगाव ढमढेरेच्या मतविभाजनामुळे बाहेरील उमेदवाराला फायदा होऊ नये. परंतु, या सूत्रावर सर्वच गटांची एकमतता साधणे कठीण ठरत आहे. दरम्यान, गावातील तरुण कार्यकर्ते मात्र स्थानिक प्रतिनिधित्वावर ठाम आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, "तळेगाव ढमढेरेसारख्या मोठ्या गावाला जिल्हा परिषदेत आवाज असायलाच हवा. आपला उमेदवार उभा राहिला पाहिजे." तळेगाव ढमढेरेचे राजकीय चित्र नेहमीच शिरूर तालुक्यात निर्णायक राहिले आहे. आमदारकी, जिल्हा परिषद, पंचायत समितीचे अनेक निर्णय तळेगावकरांच्या निर्णयाने ठरलेले आहेत. त्यामुळे आज होणाऱ्या या बैठकीकडे गटासह संपूर्ण तालुक्याचे लक्ष वेधले गेले आहे.



### गावाच्या विरोधात जाणाऱ्याला संधी नाही – नरके

» तळेगावात "एक गाव एक उमेदवार" या संकल्पनेला गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून गावातील एकजूट मजबूत होत आहे. या पार्श्वभूमीवर नुकतीच तळेगाव ढमढेरे येथे गावातील सर्वपक्षीय नेत्यांची बैठक झाली. या बैठकीत पुणे जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष बाळासाहेब नरके यांनी गावाच्या एकमताने घेतलेल्या निर्णयाविरोधात जाणाऱ्याला भविष्यात कोणत्याही निवडणुकीत किंवा पदावर संधी दिली जाणार नाही, असा इशारा दिला. गावाच्या हितासाठी सर्वांनी एकत्र राहावे आणि मतभेदाऐवजी सामंजस्यातून एक उमेदवार द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

### पदाधिकाऱ्यांचे गाव पण एकीचा अभाव!

» शिरूर तालुक्यातील तळेगाव ढमढेरे हे असे एकमेव गाव आहे जिथे सर्व प्रमुख राजकीय पक्षांचे पदाधिकारी आहेत. मात्र, स्थानिक पातळीवरील मतभेद आणि गटबाजी न संपल्याने गावात एकीचा अभाव स्पष्टपणे जाणवतो. परिणामी, आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत कोणत्याही पक्षाला ठोस पकड मिळवणे कठीण झाले आहे. तळेगाव ढमढेरेत अनेक पक्षाचे मुख्य पदाधिकारी असल्याने कसल्याही परिस्थितीत आपल्या पक्षाची उमेदवारी मिळवून निवडणूक आणून गट राखणे गरजेचे आहे.

### पक्षासाठी रणनीती आवश्यक

» तळेगाव ढमढेरेत अनेक पक्ष सक्रिय असल्याने राजकीय स्पर्धा तीव्र आहे. येथील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसाठी जोखीम मोठी असून, सक्षम उमेदवाराची निवड करणे आणि निवडून आणून पक्षाची जबाबदारी पार पाडणे हे जिकिरीचे झाले आहे. अशातच 'एक गाव, एक उमेदवार' ही संकल्पना पदाधिकाऱ्यांसाठी महत्त्वाचा टप्पा आहे.

---

# राष्ट्रवादीतील फूट व भाजपची कमी झालेली ताकद


## शिरूरच्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अनिश्चिततेच्या वळणावर; मतांचे विभाजन ठरणार निर्णायक

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुक्याच्या राजकारणात सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फूट पडलेली असताना, भारतीय जनता पक्षाची स्थानिक पातळीवरील कमकुवत झालेली संघटनात्मक स्थिती, हे दोन प्रमुख घटक आगामी नगरपरिषद, नगरपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकांमध्ये अनिश्चितता निर्माण करत आहेत.

यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्रित असताना, त्यांची लढत भाजप आणि शिवसेनेसोबत होऊन स्थानिक संस्थांवर राष्ट्रवादीचे वर्चस्व राहिले होते. पक्ष फुटीमुळे आता दिलीप वळसे-पाटील (अजित पवार गट) आणि अशोक पवार (शरद पवार गट) यांची ताकद विभागली गेली आहे. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार असे दोन गट पडल्यामुळे राष्ट्रवादीचा पारंपरिक मतदार आणि स्थानिक कार्यकर्ते दुभागले गेले आहेत.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत अजित पवार गटाचे ज्ञानेश्वर कटके यांनी अशोक पवार यांचा पराभव केल्याने कटके गटाचे मनोबल वाढले असले, तरी ग्रामीण भागातील मोठा वर्ग अजूनही पवार या नावावर निष्ठा ठेवून असल्याने शरद पवार यांच्यासोबत असल्याचे दिसत आहे. यामुळे दोन्ही गटांना स्थानिक पातळीवर स्वतंत्र उमेदवार उभे करावे लागणार असून, मतांचे विभाजन निश्चित आहे. स्थानिक निवडणुकांमध्ये पक्षापेक्षा वैयक्तिक संबंध आणि उमेदवाराची ताकद जास्त महत्त्वाची असल्याने, दोन्ही गटांतील मुख्य नेत्यांची व्यक्तिगत ताकद हीच खरी कसोटी ठरणार आहे.




### संभाव्य राजकीय समीकरणे...

» शिरूर तालुक्यात आगामी स्थानिक निवडणुकांमध्ये राष्ट्रवादीतील दोन्ही गटांमध्ये थेट लढत होण्याची शक्यता अधिक आहे. राष्ट्रवादीच्या फुटीमुळे मतांचे होणारे विभाजन भाजपसाठी सुप्त संधी निर्माण करू शकते. मात्र, त्यासाठी भाजपने अत्यंत आक्रमक आणि ध्रुवीकरणाचे राजकारण करण्याची गरज आहे. स्थानिक राजकारणात पक्षापेक्षा 'माणूस' महत्त्वाचा ठरत असल्याने, दोन्ही गटांतील नेत्यांची व्यक्तिगत ताकद आणि गट टिकवून ठेवण्याची क्षमता यावरच शिरूरच्या स्थानिक राजकारणाचे भवितव्य ठरणार आहे.